## निशाणी क्र. ०५ वरील आदेश.

अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज मुळ अर्जाचा निकाल लागे पर्यंत गैरअर्जदारांकडुन त्यांना अंतरीम पोटगीसाठी एकत्रीतपणे ४०,०००/– रुपये मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. **अर्जदारांचे थोडक्यात कथन –** अर्जदार क्र.१ चा गैरअर्जदार क्र.१ पती असून अर्जदार क्र.२ हा त्यांचा मुलगा आहे. अर्जदार व गैरअर्जदारातील नातेसंबंध अस्तीत्वात आहेत. लग्नानंतर गैरअर्जदारांनी अर्जदार क्र.१ ला सहा महिने चांगले नांदवल्यानंतर घरातील सर्व कामे करायला लावून मोलकरणीसारखी वागणूक दिली आहे. गैरअर्जदारांनी संगनमताने तिच्याशी हुंडयाच्या कारणावरुन तिला घालून–पाडून बोलून शिवीगाळी करुन शारिरीक व मानसिक त्रास दिला आहे. अर्जदार क्र.१ ने तिला होत असलेल्या त्रासाबाबत वडिलांना भेटायला आल्यानंतर सांगितले असता, गैरअर्जदारांनी त्यांना शिवीगाळी करुन अपमानित केले आहे. गैरअर्जदारांनी केलेल्या हिंसक कृतीमुळे आणि दबावामुळे अर्जदार क्र.१ चा दि.२०.०२.२०१५ रोजी गर्भपात झालेला आहे. अर्जदार क्र.१ व गैरअर्जदार क्र.१ वेगळे राहत असताना देखील गैरअर्जदार क्र.३ व ४ यांनी त्यांच्या संसारात ढवळाढवळ करुन कायम वातावरण कलूषित केले आहे. गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदार क्र.१ सोबत बळजबरीने शारिरीक संबंध करुन त्रास दिलेला आहे. गैरअर्जदारांनी दि.३०.०६.२०१५ रोजी अर्जदार क्र.१ ला गरोदर असून देखील घरातून बाहेर काढल्यामुळे ती सन २०१८ पर्यंत बाळासह माहेरी राहिली आहे. त्यानंतर अर्जदार क्र.१ मुलासह गैरअर्जदारांकडे राहण्यास गेली असता, तिच्याकडे त्यांनी हुंडयाची मागणी करुन तिला शारिरीक व मानसिक त्रास देऊन ऑक्टोबर २०२१ मध्ये अंगावरील वस्त्रानिशी हकलून दिल्यामुळे माहेरी राहत आहे. गैरअर्जदार क्र.१ ने ते वेगळे राहत असल्या पासून त्यांच्या दैनंदिन गरजांबाबत कोणतीही तरतूद केलेली नसून नांदवण्यास घेऊन जाण्याचा कोणताही प्रयत्न केलेला नाही. गैरअर्जदार क्र.१ ने सत्य परिस्थिती लपवून अर्जदार क्र.१ च्या विरोधात पनवेल न्यायालयात घटस्फोटाचा अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क्र.१ सध्या मुलासह माहेरी राहत असून तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. गैरअर्जदार क्र.१ हा केमिकल इंजिनियर असून त्याला दरमहा एक लाखापेक्षा जास्त उत्पन्न मिळत असून त्याच्यावरती अर्जदारां व्यतिरिक्त इतर कोणाचीही जबाबदारी नाही.

त्यामुळे अर्जदारांना त्यांची अंतरीम पोटगीची मागणी मान्य करण्याची विनंती केली आहे.

३. **गैरअर्जदारांचे थोडक्यात कथन–** गैरअर्जदार क्र.१ ने नि.क्र.११ प्रमाणे लेखी म्हणणे दाखल करुन अर्जदारां सोबतचे नातेसंबंध स्विकारुन त्यांनी केलेले सर्व आरोप नाकारले आहेत. त्याच्या कथनाप्रमाणे, अर्जदारांनी त्याला मानसिक त्रास देऊन त्याची बदनामी करण्यासाठी खोटा अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार क्र.१ ने सन २०१४ मध्ये तिच्या आई–वडिलांच्या घरी कायमपणे राहण्याची मागणी केली होती. गैरअर्जदार क्र.१ ने तिची समजूत काढून तिच्या मागणी प्रमाणे प्रयत्न करुन देखील अर्जदार क्र.१ व्यवस्थित नांदली नाही. अर्जदार क्र.१ ने जाणीवपूर्वक गैरअर्जदार क्र.१ सोबत संभाषण बंद करुन त्याला मुलाच्या सहवासापासून वंचित ठेवले आहे. गैरअर्जदार क्र.१ ने समेट घडवण्याचा प्रयत्न करुन देखील कोणताही उपयोग झालेला नाही. अर्जदार क्र.१ च्या हट्टी स्वभावामुळे ती कोणत्याही संयुक्तिक कारणाशिवाय वेगळी राहत असून त्यांच्या नातेसंबंधामध्ये वितुष्टता निर्माण झाली आहे. अर्जदार क्र.१ च्या बेजबाबदार पणाच्या वागण्यामुळे मुलाच्या वाढीवरती आणि त्यांच्या वैवाहिक आयुष्यावरती परिणाम झालेला आहे. अर्जदार क्र.१ ने ऑक्टोबर २०२१ मध्ये नांदण्यास येण्यास नकार दिल्यापासून तो मुलाच्या भवितव्यासाठी ईच्छा असून देखील काही करु शकत नाही. गैरअर्जदार क्र.१ ने वकिलां मार्फत नांदण्यास येण्याबाबत कायदेशीर नोटीस पाठवून देखील अर्जदार क्र.१ ने त्याला प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे गैरअर्जदार क्र.१ ला नाईलाजाने पनवेल न्यायालयात त्याबाबत दिवाणी दावा दाखल करावा लागलेला आहे. अर्जदार क्र.१ बळजबरीने मुलासह माहेरी निघून गेलेली आहे. गैरअर्जदार क्र.१ कडे त्याच्यावरील जबाबदा–या पुर्ण करता, तो अर्जदारांना दरमहा १०,०००/– रुपये देऊ शकतो. गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदार क्र.१ वरती तीने आरोप केल्याप्रमाणे कोणताही हिंसाचार केलेला नाही. सबब, त्याने अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. **विचाराधीन मुद्दे –** अर्ज व लेखी म्हणण्याचे तसेच दोन्ही विधिज्ञांच्या तोंडी युक्तीवादाचे अवलोकन केले असता माझ्या विचारार्थ खालील मुद्दे निघतात. मी त्यांचे निष्कर्ष कारणांसह खालील प्रमाणे नोंदवत आहे.

| अ.क्र. | विचाराधीन मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार क्र.१ ने प्रथमदर्शनी तिच्यावरती कौटुंबिक हिंसाचार | . . **होय.** |

झाल्याची बाब सिद्ध केली आहेत काय ?

२. अर्जदार हे अंतरीम पोटगीचा आदेश मिळण्यास पात्र आहेत काय ? . .**अंशतः होय.**

३. अंतिम आदेश काय ? . . **अंतिम आदेशा प्रमाणे.**

## <u>कारणेमिमांसा</u>

५. **मुद्दा क्र.१ व २ साठी –** मुद्दा क्र.१ व २ हे एकमेकांशी संबंधीत असल्याने ते एकत्रीतपणे चर्चेसाठी घेतले आहेत. अर्जदाराच्या आणि गैरअर्जदारांच्या वकीलांच्या युक्तीवादाचे अवलोकन करता कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ च्या कलम ३ मध्ये घरगुती हिंसाचाराची व्याख्या दिलेली आहे. त्यामध्ये शारिरिक, मानसिक, भावनिक तसेच आर्थिक छळ इत्यादी बाबींचा समावेश होतो.

६. अर्जदाराच्या विधिज्ञांनी गैरअर्जदारांनी त्यांच्या बेकायदेशीर मागण्यांसाठी अर्जदारावरती केलेल्या हिंसाचाराच्या कथनांची पुनरावृत्ती केली आहे. त्यांनी अर्जदार हे वेगळे राहत असल्यापासून गैरअर्जदार क्र. १ ने त्यांच्या दैनंदिन गरजांची पुर्तता केलेली नसल्याचे सांगून अर्ज निकाली लागेपर्यंत अंतरिम पोटगी देण्याची विनंती केली आहे. याउलट, गैरअर्जदार क्र.१ च्या वकिलांनी अर्जदार क्र.१ ने तिच्या वेगळे राहण्याच्या मागणीच्या पुर्ततेसाठी गैरअर्जदार क्र.१ चा स्वतःहून त्याग केलेला असून तिच्यावरती कोणताही कौटुंबिक हिंसाचार झालेला नसल्याचे सांगितले आहे. त्यांनी गैरअर्जदार क्र.१ हा स्वेच्छेने अर्जदारांना दरमहा १०,०००/– देण्यास तयार असल्याचे सांगितले आहे.

७. अर्ज व त्यास दाखल केलेल्या लेखी म्हणण्याचे अवलोकन केले असता सद्या अर्जदार व गैरअर्जदार मधील नाते संबंध अस्तीत्वात असुन अर्जदार हे गैरअर्जदारां पासून वेगळे राहत असल्याचे दिसुन येत आहे. अर्जदार क्र.१ ने तीच्यावरती गैरअर्जदार क्र.१ ने केलेल्या शारिरीक व मानसिक हिंसाचाराचे स्पष्टपणे कथन केले आहे. तीने गैरअर्जदारांनी तीच्यावरती केलेल्या कौटुंबिक छळामुळे ती त्याच्यापासुन वेगळी राहत असल्याचे सांगितले आहे. तीने गैरअर्जदारांनी हुंडयाची मागणी करुन तिच्यावरती शारिरीक व मानसिक हिंसाचार केल्याचे आरोप केले आहेत. गैरअर्जदारांनी त्यांच्या लेखी कथनातून अर्जदार क्र.१ ही माहेरी राहण्याच्या मागणी वरुन

संयुक्तिक कारणा शिवाय वेगळी राहत असल्याचा बचाव घेतला आहे, परंतु त्याबाबतचा कोणताही प्रथमदर्शी पुरावा दिलेला नाही. तसेच अर्जदार वेगळी राहत असल्यापासुन तिला गैरअर्जदार क्र. १ ने कशाप्रकारे आर्थीक मदत केली याचे देखील कोणतेही कथन केलेले नाही. त्यामुळे वरील सर्व बाबी या महिलांच्या शारिरिक, मानसिक, भावनिक व आर्थिक हिंसाचार या व्याख्येमध्ये मोडत असल्याने गैरअर्जदार ने अर्जदाराचा घरगुती हिंसाचार केला आहे ही बाब प्रथमदर्शनी सिद्ध होते.

८. अर्जदाराने गैरअर्जदार च्या विरोधात स्पष्टपणे आरोप केलेले आहेत. उभय पक्षकारांमधील लग्न संबंध अस्तीत्वात असुन अर्जदार व गैरअर्जदारांनी केलेले आरोप व प्रत्यारोप हे संपुर्णपणे पुराव्याचा भाग असुन ते गुणदोषांवर सिद्ध झाल्यानंतर विचारात घेतले जातील. गैरअर्जदार क्र. १ ने केवळ अर्जदाराने त्याचा स्वतःहुन त्याग केल्याचा बचाव घेतला आहे. सबब मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या ***नकुल वि. पदमीणी, २०१६ एस.सी.सी. ऑन लाईन बॉम्बे, १०६२४*** मधील न्यायतत्वाप्रमाणे अर्जदाराने स्वतःहुन त्याग केलेला असल्यामुळे पोटगी मिळण्यास पात्र नसल्याचा बचाव अंतरिम पोटगीच्या बाबत विचारात घेता येवु शकत नसल्याचा निष्कर्शावरुन अंतरीम स्थितीमध्ये असे दिसुन येते की, अर्जदार हे गैरअर्जदार क्र. १ पासुन वेगळे राहत असुन त्यांच्या मुलभुत गरजांबाबत गैरअर्जदार क्र.१ ने कोणतीही तरतुद केलेली नसून तो त्याच्यावरील कायदेशीर व नैतिक जबाबदारीमधुन पळ काढु शकत नाही. सबब, त्याने अर्जदारांना आर्थिक मदत पुरविणे क्रमप्राप्त आहे.

९. अर्जदारांच्या कथना प्रमाणे गैरअर्जदार क्र. १ ला नोकरी पासून दरमहा एक लाखापेक्षा जास्तीचे उत्पन्न मिळत आहे. दोन्ही पक्षांनी त्यांच्या मालमत्ता व उत्तरदायित्वाची शपथपत्रे दाखल केलेली आहेत. त्याप्रमाणे अर्जदार क्र.१ कडे उत्पनाचे साधन नसून गैरअर्जदार क्र.१ ला दरमहा ९२,१६२/– रुपये पगार मिळत असून त्यातील ३०,३९८/– रुपये गृहकर्जासाठी कपात होत आहेत. गैरअर्जदार क्र.१ ने स्वेच्छेने अर्जदारांना दरमहा १०,०००/– रुपये देऊ शकत असल्याचे मान्य केले आहे. अर्जदारांच्या विधिज्ञांनी देखील सदर बाब मान्य केली आहे. अर्जदार क्र.१ चे वय व तिच्यावरील अर्जदार क्र.२ ची जबाबदारी विचारात घेता, तिला नोकरी अथवा इतर कोणताही व्यवसाय करणे शक्य नाही.

१०. त्यामुळे गैरअर्जदार क्र.१ ने मान्य केलेल्या बाबीचा आणि त्याच्यावरील जबाबदा–यांचा

विचार करता, तो अर्जदारांना दरमहा एकत्रीतपणे १०,०००/– रुपये देण्यास तयार असल्याची बाब विचारात घेता, अर्ज दाखल तारखेपासुन अर्जाचा निकाल लागेपर्यंत अंतरीम पोटगी म्हणुन सदर रक्कम देणे न्यायाचे ठरेल. सबब, मी वरील विवेचना वरुन मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होय आणि मुद्दा क्र.२ चा निष्कर्ष अंशतः होकारार्थी असा नोंदवून मुद्दा क्र.३ साठी खालील आदेश पारित करीत आहे,

## आदेश

१. अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार क्र.१ ने अर्ज दाखल तारखे पासुन अर्जदारांना मुळ अर्जाचा निकाल लागेपर्यंत एकत्रीतपणे दरमहा १०,०००/– (दहा हजार रुपये) रुपये अंतरीम आर्थिक मदत म्हणुन द्यावी.

३. गैरअर्जदार क्र.१ ने सदरची रक्कम दर महिन्याच्या १० तारखेपुर्वी अर्जदार क्र.१ च्या बँक खात्यात ऑनलाईन किंवा प्रचलित माध्यमाने अथवा रोखीने जमा करावी.

४. गैरअर्जदार क्र.१ ने आर्थीक मदतीची अर्ज दाखल तारखेपासुन आदेश तारखेपर्यंतची देय असलेली संपुर्ण रक्कम दोन महिन्यांच्या कालावधीमध्ये नियमित आर्थिक मदतीच्या रक्कमेसह अर्जदार क्र.१ च्या बँक खात्यात अथवा रोखीने अथवा प्रचलित माध्यमाने जमा करावी.

५. अर्जदारांनी संयुक्तीक कारणाशिवाय पुरावा देण्यास अथवा प्रकरण चालविण्यास जाणीव पुर्वक विलंब केल्यास मंजुर करण्यात आलेली आर्थीक मदतीची रक्कम विलंबाच्या कालावधीसाठी रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

६. उभय पक्षकारांनी प्रकरणास प्राधान्य देऊन लवकरात लवकर निकाली काढावी.

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक :– २८.०४.२०२५. न्या. अ. सं. क्र.– महा.०२८९७

ठिकाण :– आजरा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.